**दि.०७/०९/२०२५ रोजी चंद्रग्रहणामुळे**
**श्रींचे शेजारतीमधील बदलाबाबत...**

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
जा.क्र.एसएसएस/मंदिर/1865/२०२५
दिनांक - 27 AUG 2025

संदर्भ:- मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.१३/०८/२०२५चे सभेतील निर्णय क्र.४१२.

**कार्यालयीन आदेश-**

श्री साईबाबा विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत पंचांगानुसार ग्रहण असल्यास ग्रहण कालावधीत श्रींचे दैनंदिन कार्यक्रमामध्ये बदल करण्यात येतात. या वर्षी मित्ती भाद्रपद शु.॥१५,शके १९४७, रविवार, दि.०७/०९/२०२५ रोजी **"खग्रास चंद्रग्रहण"** येत असून, ग्रहण भारतासह इतर देशातही दिसणार आहे. ग्रहणाचे काळामध्ये श्रींची शेजारतीची वेळ येते. त्यामुळे श्रींचे समाधी मंदिरातील दि.०७/०९/२०२५ रोजी प्रथा-परंपरेप्रमाणे दैनंदिन कार्यक्रमात बदल करणेबाबत मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.१३/०८/२०२५ रोजीचे सभेतील विषय नं.५, निर्णय क्र.४१२ नुसार- प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला आहे.

**तरी रविवार, दि.०७/०९/२०२५ रोजी खग्रास चंद्रहणामुळे श्रींचे शेजारती रात्रौ १०:०० वाजता सुरु होण्याऐवजी रात्रौ ९:१५ वा. सुरुवात होऊन, रात्रौ १०:०० चे पुर्वी ग्रहण सुरु होण्याचे अगोदर श्रींचे समाधी मंदिर बंद करण्यात येईल.** तरी उपरोक्तप्रमाणे शेजारतीमध्ये बदल होत असून, खालीलप्रमाणे विभागांनी आपले नावासमोर दर्शविल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

| अ.क्र | कार्यवाही तपशील | विभाग |
|---|---|---|
| ०१ | उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे रविवार, दि.०७/०९/२०२५ रोजी श्रींची शेजारती ठिक ९:१५ वा सुरु करुन ग्रहणापुर्वी श्रींचे समाधी मंदिर बंद करणेची कार्यवाही करण्यात यावी. | मंदिर विभाग |
| ०२ | रविवार, दि.०७/०९/२०२५ रोजी श्रींची शेजारती ठिक ९:१५ वा सुरु करुन ग्रहणापुर्वी श्रींचे समाधी मंदिर बंद करणेची कार्यवाही करणेकामी सहकार्य करावे व त्यानुसार व्यवस्था/ नियोजन करणेत यावे. | संरक्षण विभाग<br>जनसंपर्क विभाग<br>माहिती तंत्रज्ञान विभाग |
| ०३ | उपरोक्त नमूद ग्रहण कालावधीतील कार्यक्रमाचे योग्य आकाराचे बोर्ड तयार करुन मंदिर परिसर, सर्व गेट, सर्व निवासस्थाने, प्रसादालय, देणगी कार्यालय या सर्व ठिकाणी मराठी व इंग्रजी भाषेत साईभक्तांना दिसतील अशा ठिकाणी लावावे. | बांधकाम विभाग |
| ०४ | सर्व साईभक्तांना ग्रहणामुळे शेजारतीमधील बदलाची माहिती होणेकरीता संस्थानचे संकेतस्थळावर माहितीचे निवेदन मराठी व इंग्रजी भाषेत करण्यात यावे. तसेच या दिवशी ऑनलाईन आरती करणा-या साईभक्तांना देखील याबाबत माहिती देणेची व्यवस्था करावी. | जनसंपर्क विभाग<br>माहिती व तंत्रज्ञान विभाग |
| ०५ | ग्रहणाचे दिवशी शेजारतीमधील बदलाची माहिती मा.तदर्थ समिती (Ad-hoc) सदस्यांना देणेत यावी. तसेच प्रेस नोट तयार करुन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे मान्यतेने वृत्तपत्रात प्रसिध्द करणेची कार्यवाही करणेत यावी. | जनसंपर्क कार्यालय |

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

प्रत:-
०१. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक.
०२. मा.उप मुख्यकार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक.
०३. सर्व प्रशासकीय अधिकारी
०४. संबंधीत विभाग
०५. स्थळप्रत